| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा क्र.१३३/२०१८**<br>**निशाणी क्र.६० वरील आदेशा**<br>**CNRNO.MHSI**060007972018<br>फ्रान्सीस जॉकी फर्नांडीस व.२ वि. संजीव इंदुराव देसाई व.९ |

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.२ब यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १, नियम १० अन्वये दाव्याचे कामी पक्षकार म्हणुन सामील करणेस परवानगी मिळावी याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.२ब यांचे कथनाप्रमाणे, दावा ठराव होवून मिळणेकरीता व कायमच्या ताकिदकरीता दाखल केला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ यांनी वादी तसेच न्यायालयास कोणतीही पुर्वकल्पना न देता बेकायदेशीपणे दि.२६.०६.२०२५ रोजी रजिस्टर खरेदीखत क्र.१७१७/२०२५ नुसार दावा मिळकत महादुर्गा इन्फ्राटेक इन्फोटेक एलएलपी यांस विक्रीत दिलेली आहे. त्यामुळे दाव्याच्याकामी महादुर्गा इन्फ्राटेक इन्फोटेक एलएलपी तर्फे भागीदार अच्युत कुड सावंत भोसले यांना प्रतिवादी क्र.१० म्हणुन सामील करावे. सबब अर्ज.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादीने नि.६१ येथे आपले म्हणणे देऊन सदर अर्जास हरकत नोंदवलेली आहे. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे, अर्जातील मजकूर खोटा व चुकीचा आहे अर्जावर सर्व वादी यांची सही नाही. प्रस्तावीत प्रतिवादी क्र.१० हा आवश्यक पक्षकार नाही. त्याचे विरुध्द दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा ठरावासाठी व कायम ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. अर्जातील कथनानुसार प्रतिवादीने दावा मिळकत ही महादुर्गा इन्फ्राटेक इन्फोटेक एलएलपी यांना विक्री केली आहे. त्या पुष्ठ्यर्थ नि. ५९ वरील यादीसोबत वादीने फेरफार क्र. ७७६६, दावा मिळकत गट क्र. १९३/२ब चा सातबारा उतारा आणि सदर खरेदीखताची छायांकित प्रति अभिलेखावर दाखल केली आहे. यावरुन प्रतिवादी क्र. १ ने प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १० यांचे हक्कांत दावा मिळकत गट क्र. १९३/२ब चे खरेदीखत लिहून दिले असल्याचे स्पष्ट होते. तसे खरेदीपत्र झालेले नाही असे प्रतिवादीचे म्हणणे नाही. सदर खरेदीखतामुळे दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसम यांचा हक्क व अधिकार निर्माण झाला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे त्यांचे गैरहजेरीमध्ये दाव्याचा निर्णय

झाल्यास त्यांच्या हक्कांवर गदा येणार आहे. त्यामुळे प्रस्तावित प्रतिवादी क्र. १० हे दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत.

**६.** प्रतिवादीच्या कथनानुसार अर्जावर सर्व वादींची सही नाही. परंतु, क्रम १ नियम १० अन्वये "*कार्यवाहीच्या कोणत्याही टप्पयावर कोणत्याही पक्षकाराकडून आलेल्या अर्जावरुन किंवा तसा अर्ज आला नसतानाही आणि न्यायालयास न्याय वाटतील अशा अटीवर वादी किंवा प्रतिवादी म्हणुन ज्या व्यक्तीला सामिल करुन घ्यावयास हवे होते किंवा दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारक रित्या व पुर्णपणे अधिनिर्णय करुन ते निकालात काढणे न्यायालयास शक्य होण्यासाठी कोणत्याही व्यक्तीस पक्षकार करण्यात यावे असा आदेश न्यायालयात देता येईल.*" अशी तरतुद आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या अर्जावर सर्व वादींची सही आवश्यक आहे असे नाही. त्यानुसार प्रस्तुत दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पुर्णपणे अधिनिर्णय करुन ते निकालात काढण्याच्या दृष्टीने प्रतिवादी म्हणून प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १० आवश्यक पक्षकार आहेत. त्यांना प्रस्तुत कामी अर्जातील विनंती नुसार पक्षकार करणे न्यायोचित आहे. सबब, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १० यांना प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी सदरात पक्षकार म्हणुन सामील करावे.

३. वादीने पुढील तारखेपर्यंत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

SHIVAJI PANDURANG PATIL

Digitally signed by SHIVAJI PANDURANG PATIL
Date: 2026.07.06 18:21:01 +0530

( एस.पी.पाटील )

दिनांक– ०६/०७/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,सावंतवाडी